ISSN: 2249-894X Impact Factor :3.1402 (UIF) Volume- 5 |Issue- 11 |August - 2016

Review Of Research

# मानवेंद्रनाथ रॉय यांचे राजकीय विचार : एक अभ्यास

प्रा. व्हनहुवे के. टी.
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय,
बार्शी, जि. सोलापूर.



**सारांश ÷**

मानवेंद्रनाथ रॉय यांनी मानवी स्वातंत्र्याचे निकष लावून मार्क्सवादी तत्वज्ञानाचे मूल्यमापन केले आहे.

**प्रस्तावना ÷**

भारतीय राजकीय विचारवंतामधील प्रमुख विचारवंत म्हणून गणले गेलेले मानवेंद्रनाथ रॉय यांचे राजकीय विचार मोलाचे आहेत. प्रखर राष्ट्रवादी, क्रांतिकारक, मार्क्सवादी आणि शेवटी मानवतावादी अशा विविध भूमिकेतून राजकीय स्वातंत्र्यासाठी झटणारे थोर विचारवंत अशी मानवेंद्रनाथ रॉय यांची ओळख आहे. स्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य, धर्मनिरपेक्ष–नैतिकता या तीन मूल्यांवर आधारलेला नवमानवतावाद रॉय यांनी मांडला. मानवेंद्रनाथ रॉय यांच्यावर अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल, दयानंद सरस्वती, बकिमचंद्र चटर्जी, विं. दा. सावरकर, इत्यादींचा प्रभाव पडला होता. रॉय यांनी अनेक देश, विदेशामध्ये वास्तव्य करून राजकीय जीवनाला आणि विचाराला आकार देण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. म्हणूनच संशोधकाने त्यांचे विचार अभ्यासण्यासाठी वरील विषयाची निवड केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे ÷**

1) मानवेंद्रनाथ रॉय यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.
2) मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांची प्रासंगिकता मांडून, निष्कर्ष काढणे.
3) मानवेंद्रनाथ रॉय यांचे राजकीय व्यक्तिमत्व आणि विचार नव्या पिढीला माहित करून देणे.

**गृहितके ÷**

1) मानवेंद्रनाथ रॉय प्रखर राष्ट्रवादी होते.
2) एम. एन. रॉय यांचा स्वातंत्र्य, बुध्दिप्रमाण्य, धर्मनिरपेक्ष यावर दृढ विश्वास होता.

**प्रखर राष्ट्रवादीकडून मार्क्सवादीकडे ÷**

रॉय त्यांच्या सुरूवातीच्या काळात राजकीय क्रांतीचे उपासक म्हणून राष्ट्रवादाकडे आकर्षित झाले होते. परंतू श्सशस्त्र क्रांतीद्वारे व्यक्तीचे बळी घेता येतील परंतू ब्रिटीश सरकारच्या यंत्रणेला धक्का पोहचणार नाही म्हणून ते सामुदायिक आंदोलनाकडे वळले. अमेरिकेत वास्तव्याला असताना त्यांनी मार्क्सवादी तत्वज्ञानांचा अभ्यास केला, मार्क्सवादी विचाराने भारावून गेल्यामुळे आणि क्रांतीच्या मार्गाने राजकीय स्वातंत्र्याबरोबरच शोषण रहित, वर्गरहित समतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी मार्क्सवादी विचारच उपयोगी पडतील अशी रॉय यांची धारणा झाली. त्यामुळे ते प्रखर राष्ट्रवादीकडून मार्क्सवादीकडे वळले. मार्क्सवादी तत्वज्ञानातील भौतिकवाद व मानवतावाद दृष्टीकोन या दोन्ही गोष्टींवर रॉय यांची नितांत श्रध्दा होती. रॉय मार्क्सच्या भौतिकवादी विचारांशी सहमत होते. मार्क्सच्या मते, निसर्ग आणि समाज नेहमी बदलत असतो. मार्क्सने हेगलचे विरोध विकासवादाचे तत्व

स्वीकारून विश्वाच्या विकासाचे वास्तववादी चित्रण केले. कार्ल मार्क्स प्रमाणेच एम. एन. रॉय यांनीही धर्म ही बाब त्याज्य मानली. कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद रॉय यांनी स्विकारला होता. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात आर्थिक उत्पादनांची व विनिमयाची जी व्यवस्था प्रचलित असते. तिच्या आधारे समाजरचना कायमस्वरूपी नसते. कारण उत्पादने साधने गतिमान व परिवर्तनीय असतात. त्यामुळे उत्पादन साधनांचा व विनिमयाच्या व्यवस्थेत नेहमी संघर्ष होऊन बदल होत असतो. या मार्क्सच्या विचारांशी रॉय यांनी सहमत होते मार्क्सवादी विचाराने प्रेरित होऊन 1917 साली सोव्हियत रशियात क्रांती घडून आली. त्या क्रांतीने मानवेंद्रनाथ रॉय प्रभावित झाले होते. त्यामुळे ते पुर्णपणे मार्क्सवादी बनले आणि आपल्या जीवनातील पुढील काळ मार्क्सवादी विचारांचे प्रसार आणि प्रचार करण्यात घालविले. शेतकरी, कामगार, व मध्यमवर्ग यांना एकत्रित करून ब्रिटीश सत्तेविरूध्द क्रांती घडवून आणावी अशी मानवेंद्रनाथ रॉय यांची धारणा होती.

## मार्क्सवादाचा उणिवा व मर्यादा :-

रॉय यांनी रशियन क्रांतीमुळे मार्क्सच्या विचाराकडे आकर्षित झाले होते. पुढे राज्य क्रांतीची परिणिती हुकुमशाहीत झाली आणि त्यामुळे वर्गविहीन, राज्यविहीन समाज रशियात निर्माण झाला नाही, उलट स्टॅलिनच्या अमर्याद, निरंकुश, सत्ता पाहून रॉय हे मार्क्सवादापासून दूर गेले.

## मार्क्सवादातील उणिवा

1) सोव्हियत रशियात जी क्रांती झाली ती क्रांती योगायोगाने व परिस्थितीनूसार झालेली क्रांती होती.

2) 'राज्य विरुन जाईल' असे स्वप्नरंजक ध्येय बाळगून मार्क्सने वर्गविरहित समाजाची संकल्पना मांडली पण तसे न होता राज्य अधिक शक्तिशाली झाले. आणि सत्ताधारी लोकांचा नवीन वर्ग निर्माण झाला.

3) रॉय यांच्या मते मार्क्सचा दृष्टीकोन केवळ पोथीनिष्ठ होता कारण काळमानानुसार प्रत्येक सिध्दांतात बदल होतो. तो बदल मार्क्सवादयांना मान्य नव्हता, केवळ पोथीनिष्ठामुळे बुध्दिप्रामाण्यवादाचा अपमान होऊन वैचारिक स्वातंत्र्य संपुष्टात येईल असे रॉयना वाटत होते.

4) मार्क्सने भांडवलशाही नष्ट करण्यासाठी हिंसेचे तत्व स्विकारले ते रॉय यांना मान्य नव्हते. सहकार्य, सहजीवन, व्यक्तिच्या जीविताचा हक्क इत्यादी गोष्टींना धोका पोहचतो असे ते मानत असत.

5) मानवेंद्रनाथ रॉय यांना मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिध्दांत अपूरा वाटत होता. रॉय यांच्या मते मानवी जीवनाच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यात वर्ग निर्माण झाले आणि त्यांच्या संघर्षातून विकास घडून आला असला तरी, संघर्षमूलक शक्तीबरोबरच समन्वय शक्ती ही समाजव्यवस्था टिकविण्यास कारणीभूत ठरते हे नाकारुन चालणार नाही.

6) कार्ल मार्क्सने समाजाची विभागणी फक्त दोनच वर्गात केली आहे, ती अयोग्य वाटते. कारण समाजात भांडवलदार व मजूर वर्गाव्यतिरिक्त मध्यम वर्गही, आहे. मार्क्सने आपल्या वर्गसंघर्षाच्या विचारात मध्यम वर्गाकडे दुर्लक्ष केले आहे.

7) मार्क्सने आपल्या राजकीय तत्वज्ञानात केवळ आर्थिक घटकांचा विचार केलेला आहे. त्याने सांस्कृतिक, नैतिक, आध्यात्मिक अशा गोष्टींकडे इतर कोणत्याच बाजूने विचार केलेला नाही.

मानवेंद्रनाथ रॉय यांनी वरीलप्रमाणे मार्क्सवादी तत्वज्ञानातील उणिवा दाखवून सोव्हियत रशियाचा क्रांतीने मार्क्सवादाची सगळी भाकिते खोटी ठरल्यामुळे रॉय मार्क्सवादी विचारापासून दूर गेले.

## नवमानवतावाद :-

रॉय यांनी आपल्या वैचारिक आणि राजकीय जीवनाच्या शेवटच्या काळात नवमानवतावादाचा पुरस्कार केला– नवमानवतावाद, मार्क्सवादाप्रमाणेच ही एक मूलगामी आणि समाजिक जीवनाच्या सर्व अंगाचा उलगडा करुन मार्गदर्शन करणारी विचारसरणी आहे, नैतिक आणि सांस्कृतिक मूल्यांवर आधारलेली समाजव्यवस्था घडविण्यासाठी संसदीय लोकशाहीचे तत्वज्ञान आणि मार्क्सवादी तत्वज्ञान या दोहोंतून एका वेगळया सामाजिक व राजकीय तत्वज्ञानाची आवश्यकता ओळखून रॉय यांनी नवमानवतावाद मांडला. रॉय यांच्य मते संस्कृतीशून्य राज्यक्रांतीमुळे व्यक्तीचे, पक्षीय हुकुमशाही प्रस्थापित झाली. त्यामुळे रॉय यांना समाज परिवर्तनासाठी सांस्कृतिक परिवर्तनाची आवश्यकता आहे. अशी रॉय यांची समजूत झाली होती. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मूलगामी मानवतावदामध्ये स्वातंत्र्य, बुध्दिप्रामाण्यवाद, धर्मनिरपेक्ष नैतिकता इत्यादी मानवी जीवनाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांचा पुरस्कार करुन मूलगामी लोकशाहीचे महत्व स्पष्ट केले आहे.

## निष्कर्ष :-

1) मानवेंद्रनाथ रॉय यांचा राजकीय विचारांचा प्रवास परिस्थितीनुसार क्रांतीकारक राष्ट्रवादीकडून मार्क्सवादाकडे आणि शेवटच्या काळात मार्क्सवादाकडून नवमानवतावादाकडे असा बदलत गेला. यावरुन मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारामध्ये निरपेक्ष भाव दिसतो.

2) रॉय यांच्या मतानूसार रशिया आणि चीन सारख्या क्रांती झालेल्या देशात वर्गविरहित, राज्यविरहित समाज व्यवस्थेऐवजी सुरुवातीला पक्षीय हुकुमशाही आणि काही काळानंतर व्यक्तीची हुकुमशाही प्रस्थापित झालेली दिसून येते.

3) दुसऱ्या महायुद्धानंतर राजकीय व विचारसरणीच्या आधारे झालेली जगाची विभागणी आणि त्याचे परिणाम शीतयुद्ध घडले. त्यामुळे झालेली व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी झाली. यामुळे रॉय यांच्या मार्क्सवादी विचारांमध्ये असलेल्या उणिवा आणि मर्यादा व्यक्त करण्यासाठी मांडलेल्या विचारांना बळकटी मिळते.

4) रॉय यांनी मानवी स्वातंत्र्याचा निकष लावून मार्क्सवादी तत्वज्ञानाचे मूल्यमापन केले.

5) सोव्हियत रशियाचे झालेले विघटन आणि जगामधली साम्यवादी विचारांची झालेली पीछेहाट, चीन सारख्या साम्यवादी देशातील पक्षीय हुकुमशाही यामुळे रॉय यांचे मार्क्सवादातील उणीवा दाखवणारे विचार समर्पक वाटतात.

6) रशिया, चीनसारखे राष्ट्राने नेत्रदिपक आर्थिक प्रगती केली असली तरी सांस्कृतिक बाबींमध्ये साम्यवादी देशांची पीछेहाट झालेले दिसते.

7) रॉय यांनी मांडलेली मूलगामी लोकशाहीची संकल्पना आदर्शवादी वाटते.

8) रॉय यांनी राजकारणाला तात्विक अधिष्ठान मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

## संदर्भसूची :-

1) भारतीय राजकीय विचार – बी. बी. पाटील

2) प्राचीन व आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत – डॉ. वा. भा. पाटील.

3) एम एन रॉय विशेषांक – संपादक मे. पु. रेगे

4) भारतीय राजकीय विचारवंत – भा. ल. भोळे.